नि.दि.वा.क्र.०५/२०१५

नि.क्र.२१ वरील आदेश
( घोषित दिनांक २९ एप्रिल,२०१६ )

१. वादी/अर्जदार यांनी खरेदीखत रद्द करण्याबाबत वाद जमिनीच्या वाटण्या होवुन ताबा मिळण्याबाबत दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये वादी याने नि.क्र.२१ वर तातपुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला. वादी/अर्जदार यांनी प्रस्तुत दावा जमिनीच्या वाटण्या होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वाद जमिन मौजे इस्लामपुर,ता.मंगरूळपीर येथील सर्व्हे नं.७/३ गट क्र.३४ मधील आहे. वाद जमिन ही अर्जदाराची वडीलोपार्जीत मालमत्ता असुन सदर मालमत्तेशी गैरअर्जदाराचा संबंध नाही. अर्जदाराने वहीती केली असुन त्यामध्ये सोयाबीनचे पीक उभे असुन ते काढणीस आहे. गैरअर्जदार अर्जदाराला पीक काढण्यापासुन अडथळा निर्माण करित आहे. अर्जदाराने स्वता वाद जमिनीची वहीती केली. अर्जदाराचे कधीही न भरून होणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याला त्याच्या ताब्याला गैरअर्जदार यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात यावा.

२. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी/गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी नि.क्र.२२ वर आपले लेखी जवाब दाखल केले. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वाद जमिन पांडुरंगची स्वअर्जीत मालमत्ता होती व त्याच प्रमाणे पांडुरंगकडे आणखी दोन स्वअर्जीत मालमत्ता होत्या. त्याने आपल्या जिवंतपणीच वादींना प्रत्येकी एक एक अशा देवुन टाकल्या होत्या व ही जमिन पांडुरंगने स्वता आपल्याकडे राखुन ठेवली होती. सबब वादींना वाद मालमत्तेमध्ये कोणतेही अधिकार नाही. पांडुरंगने वाद मालमत्ता १८/४/७८ ला प्रतिवादी क्र.१ यांना ४००० रूपयामध्ये विकुन हस्तांतरीत केली तेव्हापासुन वाद मालमत्ता ही प्रतिवादी क्र.१ च्या प्रत्यक्ष ताब्यात आहे. गैरअर्जदार याने वादमालमत्ता प्रतिवादी क्र.१ कडून २१/११/२०१४ ला विकत घेतली. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा.

३. प्रतिवादी/गैरअर्जदार यांनी नि.क्र.२४ च्या यादी सोबत कागदपत्र व वाद शेताचे फोटो दाखल केलेले आहे. वादी/अर्जदार यांनी जगन जयाजी ठाकरे यांचे शपथपत्र दाखल केले आहे तसेच वादी यांनी सदाशिव महादेवराव चव्हाण यांचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी/गैरअर्जदार यांनी नि.३२ च्या यादीसोबत कागदपत्र दाखल केलेले आहे तसेच नि.क्र. ३५ च्या यादीसोबत कागदपत्र दाखल केलेले आहे.

४. वादी/अर्जदार तर्फे अॅड श्री.बी.एम.ठाकरे तसेच प्रतिवादी/गैरअर्जदार तर्फे श्री. आर.सी.बंग यांचा युक्तीवाद एकण्यात आला व वादी/अर्जदार व प्रतिवादी/गैरअर्जदार यांच्या बाजुवरून खालील मुद्दे काढण्यात आले व त्याचे सकारण उत्तर देण्यात येत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार/प्रतिवादी हे सिध्द करतो काय की, प्रथमदृष्टया प्रकरण त्याचे बाजुने आहे ? | .. | नकारार्थी |
| २. | अर्जदार/प्रतिवादी हे सिध्द करतो काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | .. | नकारार्थी |
| ३. | अर्जदार/प्रतिवादी हे सिध्द करतो काय की, जर त्याला तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश मिळाला नाही तर त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल ? | .. | नकारार्थी |
| ४. | काय आदेश | .. | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिंमासा

५. मुद्दा क्र.१ चे उत्तर :—

अर्जदार/वादी यांचे असे म्हणणे आहे की वाद मालमत्ता ही वडीलोपार्जीत आहे व वाद मालमत्तेशी गैरअर्जदारांचा काहीही संबंध नाही. वाद जमिन अर्जदाराने वहीत केलेली आहे त्यामध्ये सोयाबीनचे पीक उभे आहे व ते काढणीस आहे. गैरअर्जदार अर्जदाराला पीक काढण्यापासुन अडथळा निर्माण करीत आहे व शेतात आल्यास जिवाने मारण्याची धमकी देत आहे. त्यामुळे अर्जदार यांना तात्पुरता मनाई हुकूम देण्यात यावा. याउलट गैरअर्जदार यांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी/गैरअर्जदार क्र.१ च्या वडीलांची वाद मालमत्ता आहे. पांडुरंगकडे वाद मालमत्ते शिवाय इतर कोणतीही मालमत्ता नव्हती. पांडुरंग याने काही मालमत्ता रमेशला दिली व वेगळे केले व उर्वरित मालमत्ता मनोरमा हिला १८/४/७८ ला विकली. प्रतिवादी/गैरअर्जदार क्र.१ च्या नावे त्याबाबत नोद करण्यात आलेली आहे व पेरेपत्रकामध्ये सुध्दा तिच्या नावाची नोद आहे. मनोरमा हिने २१/११/२०१४ ला दोन वेगवेगळया खरेदीव्दारे वादमालमत्ता प्रतिवादी/गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना विकली व त्यानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ च्या नावे फेरफार घेण्यात आलेले आहे. त्यावेळेस वादीने/अर्जदाराने कोणताही आक्षेप घेतला नाही व चौकशीअंती प्रतिवादी/गैरअर्जदार क्र.२ व ३ च्या नावे नोद करण्यात आली. दि.१८/४/७८ च्या खरेदीखताचे अवलोकन केले असता

असे दिसुन येते की, सर्व्हे नं.७/३ यातील २ हे. ५६ आर एवढी जमीन पांडुरंग शामजी भगत यांनी मनोरमा शालीकराम राउत यांना विकलेली आहे. तसेच गैरअर्जदार याने तहसिलदार यांच्या न्यायालयामधील असलेल्या प्रकरणाच्या रोजनाम्याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे, त्याचे अवलोकन केले असता मनोरजा शालीकराम राउत हिने त्यांच्या मालकीची जमीन अरविंद मोतीराम भगत व सुषमा अरविंद भगत यांना नोदणीकृत खरेदीने विकलेली आहे असे नमुद आहे. गैरअर्जदार यांनी तलाठी इसलामपुर यांचा अहवाल दाखल केलेला आहे. त्या अहवालामध्ये असे नमुद आहे की सर्व्हे नं.७/३ गट नं.३४ मधील २ हे. ५७ आर जमिन मनोरमा शालीकराम राउत हिच्या ताब्यात व मालकीची होती, त्यानंतर तिने सदर जमिन २१/११/२०१४ अरविंद मोतीराम भगत यांना १ हे. २९ आर व सुषमा अरविंद भगत हिला १ हे. २८ आर जमिन विक्री केलेली आहे व सदर जमिन त्यांच्या वहीतीत व ताब्यात आहे व सन २०१५–२०१६ च्या हंगामात सोयाबीन, तुर पिकाची पेरणी केलेली आहे. गैरअर्जदार यांनी सर्व्हे नं.७/२ चा ७/१२ दाखल केला त्यामध्ये २ हे. ५७ आर जमिन मनोरमा शालीकराम राउत हिच्या ताब्यात व वहितीमध्ये दिसुन येते. सन २०१५–२०१६ च्या ७/१२ चे अवलोकन केले असता सर्व्हे नं.७/३ गट नं.३४ अरविंद मोतीराम भगत व सुषमा अरविंद भगत यांच्या नावे आहे असे दिसुन येते व त्यांनी सन २०१५–२०१६ ला सोयाबीन,तुर,कापुस पेरलेले आहे असे दिसुन येते. यावरून ही बाब सिध्द होते की वाद शेत प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या ताब्यात आहे. वादी/अर्जदार याचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी/गैरअर्जदार लोकांनी त्याच्या ताब्यामध्ये अडथळा निर्माण केला व त्याला जिवाने मारण्याची धमकी दिली परंतु वादी/अर्जदार याने त्याबाबतची फिर्याद पोलीसस्टेशनला दिली आहे असे दिसुन येत नाही. वादी/अर्जदार याने मुद्दा क्र.१ सिध्द न केल्यामुळे मी त्याचे उत्तर नकारार्थी देत आहे.

६. <u>मुद्दा क्र.२ चे उत्तर</u> :–

अर्जदार याने प्रथमदृष्टा प्रकरण स्वताच्या बाजुने आहे ही बाब सिध्द केलेली नाही. अर्जदार यांनी अभिलेखावर जगन जयाजी ठाकरे यांचे प्रतिज्ञालेख दाखल केलेला आहे, त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व्हे नं.७/३ गट क्र.३४ मधील २. हे. ५७ आर जमिन रमेश भगत यांनी त्याला वहीतीकरिता दिली होती परंतु सदर प्रतिज्ञालेखाला दुजोरा म्हणुन अर्जदार यांनी वहीतीला जमीन जगनला दिली याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही तसेच रमेश याने स्वताच्या नावाचा ७/१२ दाखल केला नाही त्यामुळे सदर प्रतिज्ञालेखावर विश्वास ठेवणे योग्य होणार नाही. गैरअर्जदार यांनी सदाशिव महादेव

चव्हाण यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्याने त्याच्या शपथपत्रामध्ये असे म्हटले आहे की तो अरविंद भगत व सुषमा भगत यांना ओळखतो. त्याचा भाऊ अरूण नोकरीच्या निमित्ताने नागपुर येथे राहतो त्यामुळे त्याच्या शेतीचे संपुर्ण व्यवस्थापन तो प्रत्यक्ष करीत असतो. दाव्यातील प्रतिवादी अरविंद व सुषमा यांचा सर्व्हे नं.७/३ गट क्र.३४ मधील २ हे. ५७ आर जमिन त्याच्या नेहमीच्या पाहण्यातील आहे. त्यांच्या कास्तकाराची कामे त्याच्या जामिनीमधुन दिसते. वाद जमिन मनोरमाबाई हिच्या ताब्यात व वहीतीत होती व तिने ती जमिन अरविंद भगत व त्याची पत्नी सुषमा यांना अर्धी अर्धी विकली. चालु वर्षी त्यांनी वाद शेतात सोयाबीनचे पीक घेतले. त्याने त्याचे टॅक्टर भाऊयाने दिले होते. सदर बाबीला दुजोरा मिळण्याकरिता गैरअर्जदार यांनी सदाशिव चव्हाण यांनी टॅक्टर भडयाने दिले होते याबाबतची पावती लिहुन दिलेली आहे. अर्जदाराच्या बाजुपेक्षा गैरअर्जदार यांची बाजु जास्त योग्य व संयुक्तीक वाटते त्यामुळे न्यायाचा समतोल गैरअर्जदार यांच्या बाजुने दिसुन येतो. अर्जदार यांनी मुद्दा क्र.२ सिध्द न केल्यामुळे मी त्याचे उत्तर नकारार्थी देत आहे.

७. <u>मुद्दा क्र.३ चे उत्तर</u> :–

वादी याने नि.क्र.२१ वर तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे त्यामध्ये वादी/अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, वाद जमिनीमध्ये त्याने वहीती केलेली आहे व सोयाबीनचे पिक उभे आहे. गैरअर्जदार त्याला पिक काढण्यापासुन अडथळा करीत आहे व जिवाने मारण्याच्या धमक्या देत आहे तसेच जर तात्पुरता मनाई हुकूम मिळाला नाही तर त्याचे कधीही न भरून निघणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. अर्जदाराची केस ही संकृत दर्शनी आहे त्यामुळे अर्जदार याला तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश देण्यात यावा.

८. अर्जदार याने अभिलेखावर त्याने शेत जमिन वहीती केली ही बाब सिध्द करण्याकरिता चालु वर्षाचे पेरेपत्रक दाखल केले नाही तसेच वाद जमिनी विषयी त्याला आदेश मिळाला नाही तर त्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल ही बाब सिध्द केली नाही. वाद जमिन गैरअर्जदार क्र.१ व २ यांच्या ताब्यात व वहीतीत आहे ही बाब गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी कागदपत्र दाखल करून सिध्द केलेली आहे. त्यामुळे अर्जदारच्या बाजु पेक्षा गैरअर्जदार यांची बाजु संयुक्तीक वाटते. अर्जदार याने मुद्दा क्र.३ सिध्द न केल्यामुळे मी त्याचे उत्तर नकारार्थी देत आहे.

९. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामधील असलेला वाद पुराव्याअंती निकाली

निघणारच आहे. अर्जदार याने स्वताच्या तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाप्रमाणे स्वताच्या बाजुने संकृत दर्शनी प्रकरण आहे ही बाब सिध्द केलेली नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी वाद जमिन त्यांच्या वहीतीत आहे ही बाब सिध्द केलेली आहे. अर्जदार याने स्वताची बाजु सिध्द न केल्यामुळे मी खालील आदेश पारीत करित आहे.

आ दे श

१. अर्जदार यांचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खारीज करण्यात येतो.

२. खर्चाचा आदेश अंतिम आदेशाच्या वेळी करण्यात येईल.

( म.म.गुप्ता )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
दिनांक : २९ एप्रिल,२०१६ मंगरुळपीर

नि.दि.वा.क्र.७३/२०१५
बंडु–वि–प्रदीप

<u>नि.क्र.५ वरील आदेश</u>
( घोषित दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ )

१. अर्जदार/वादी याने कायम स्वरुपी मनाई हुकूम मिळणे बाबत दावा दाखल केला आहे व त्यासोबत तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याचे अर्ज सुध्दा दाखल केले आहे. वादीची थोडक्यात बाजु अशी आहे की, गट नं.२६४, सर्व्हे नं.१०७, क्षेत्रफळ ४ हे. ०.४९ आर. पैकी ६ एकर, ६ गुंठे जमीन त्याने दि.२०.०३.१९८० रोजी नारायण रेवजी यांचेकडुन ३०००/– रुपयात रजिष्टर्ड खरेदीखताद्वारे विकत घेतली. त्यानंतर त्याने वेळोवेळी ५ एकर ३६ गुंठे एवढी जमीन विकली असुन त्याच्याजवळ फक्त वादजमीन शिल्लक राहलेली आहे व त्या जमीनीची सात–बारा व नमुना–८ मध्ये नोंद आहे व सदर जमीन त्याच्या ताब्यात व वहितीत आहे. त्याने वादशेताची पेरणी दि.२०.०६.१५ ला केली. त्यानंतर त्याच्या गैरहजेरीमध्ये दि. २४.०६.१५ ला प्रतिवादीने जबरदस्ती त्याचे शेत पेरले. त्याबाबत त्याने त्याला विचारणा केली असता प्रतिवादीने त्याला शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

२. अर्जदार/वादी याच्या मनामध्ये अशी भिती निर्माण झाली आहे की, प्रतिवादी हा त्याच्या ताब्यामध्ये अडथळा करेल, त्यामुळे त्याने सदर मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार/प्रतिवादी हा हजर झाला. त्याने नि.क्र.१४ वर

आपले लेखी जवाब व तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाला उत्तर दाखल केले. त्याने वादीचे म्हणणे नाकबुल केले. त्याच्या अतिरिक्त जवाबामध्ये त्याने असे म्हटले आहे की, वादी याने वेळोवेळी जमीन विकलेली आहे. तसेच वादी याने मनोहर त्राटक यांना ०.४३ आर. जमीन विकुन त्याची खरेदी ०.७० आर. जमीनीची करुन दिलेली आहे. तसेच ०.३५ आर. जमीन लघुसिंचन विभागाने ताब्यात घेतली असुन वादी याने ०.८५ आर. जमीन बबन काटेकर यांना तसेच ०.८३ आर जमीन द्वारकाबाई सोनटक्के यांना विकलेली आहे, त्यामुळे वादीकडे कोणतीही जमीन शिल्लक राहीलेली नाही. पुढे त्याचे असे म्हणणे आहे की, सात–बारा मध्ये चुक असल्यामुळे त्याने तहसिलदार, मंगरुळपीर यांच्याकडे सात–बारा दुरुस्तीबाबत अर्ज दिलेला आहे, त्यामुळे वादीचे तात्पुरत्या मनाई हुकूमाचे अर्ज खारिज करण्यात यावे.

४. अर्जदार/वादी याने नि.क्र.४ वर असलेल्या यादीसोबत दि.२४.०६.१५ चे जबानी रिपोर्ट तसेच गट नं.२६४ चा सात–बारा, नमुना ८–अ ची प्रमाणित नक्कल, तसेच पेरेपत्रकाचा दाखला, फेरफार, गट नं.२६४ च्या चर्तुसिमेचा दाखला व हैशियत दाखला दाखल केलेला आहे. वादी/अर्जदार याने स्वत:ची वहिती दाखविण्याकरीता नि.क्र.१६ च्या यादीप्रमाणे नितीन गजानन गावंडे यांचे, दिनकर श्रीराम लाटे यांचे प्रतिज्ञालेख दाखल केलेले आहे. तसेच पेरेपत्रकची नक्कल दाखल केलेली आहे.

५. गैरअर्जदार/प्रतिवादी याने नि.क्र.१३ च्या यादीसोबत दि.०२.०६.१५ या तारखेचे फेरफार, तसेच एकुण ६ फेरफारच्या सत्यप्रती, तसेच दि.३०.०४.१५ ला पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादची स्थळप्रत, तसेच दि.०८.०६.१५ ला तहसिलदार, मंगरुळपीर यांच्याकडे दाखल केलेल्या दुरुस्तीचे अर्ज, गट नं.२६४ चा सात–बारा, लघुसिंचन विभागाच्या अवार्डची नक्कल, तसेच लघुसिंचन विभागाने पैसे वाटप केले याबाबतची यादी व साक्षीदार देविदास नरहरी ठाकरे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. गैरअर्जदार/प्रतिवादी याने नि.क्र.१८ प्रमाणे उपविभागीय अभियंता, पाटबंधारे विभाग यांचे पत्र, तसेच प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र.२३ प्रमाणे राम प्रदीप कराळे यांचे प्रतिज्ञालेख, तसेच डमी मतपत्रिका व तलाठी याने दिलेले पेरेपत्रक दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र.१५ वर वादी याने दाखल केलेले जवाब दाखल केलेले आहे.

६. अर्जदार/वादी तर्फे श्री.आर.जे.ठाकरे व गैरअर्जदार/प्रतिवादी यांचे तर्फे श्री. बी.एम.ठाकरे यांचे युक्तीवाद ऐकण्यात आले. खालील मुद्दे काढण्यात आले व त्याचे सकारण उत्तर देण्यात येत आहे.

| | मुद्दे | | उत्तर |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार/वादी हे सिध्द करतो काय की, प्रथमदृष्टया प्रकरण त्याचे बाजुने आहे ? | .. | होकारार्थी |
| २. | अर्जदार/वादी हे सिध्द करतो काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | .. | होकारार्थी |
| ३. | अर्जदार/वादी हे सिध्द करतो काय की, जर त्याला तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश मिळाला नाही तर त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल ? | .. | होकारार्थी |
| ४. | काय आदेश | .. | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारण—मिमांसा

७. मुद्दा क्र.१ चे उत्तर :—

अर्जदार/वादी याचे असे म्हणणे आहे की, त्याने गट नं.२६४ मौजे कंझारा येथील दि.२०.०३.८० ला नारायण रेवजी यांच्याकडुन ६ एकर, ६ गुंठे जमीन खरेदीखतान्वये विकत घेतली. त्यानंतर अर्जदाराने वरील जमीनपैकी ५ एकर ३६ गुठे वेळोवेळी विकलेली आहे व आज रोजी त्याचे जवळ ०.०८ आर शेतजमीन शिल्लक आहे व सदर ०.०८ आर जमीनीची तो वहिती करतो. दि.२०.०६.१५ ला त्याने त्या शेतामध्ये पेरणी केलेली आहे, परंतु दि.२४.०६.१५ ला गैरअर्जदार याने त्याच्या शेतामध्ये जबरदस्तीने पेरणी केलेली आहे. त्यामुळे त्याच्या मनामध्ये भिती निर्माण झाली आहे की, गैरअर्जदार हा कधीही त्याच्या शांततामय ताब्याला अडथळा निर्माण करेल. वादी याने स्वत:ची बाब सिध्द करण्याकरीता नि.क्र.४ वरील यादीसोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. गट क्र.२६४ च्या सात—बाराचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ०.०८ आर जमीन अर्जदार यांच्या नावे आहे. तसेच गांव नमुना ८—अ मध्ये सुध्दा वादी याचे नाव आहे असे दिसुन येते. वादी याने दि.२६.०६.१५ चे पेरेपत्रक दाखल केले असुन त्या पेरेपत्रकाप्रमाणे वादी याने गट नं.२६४ मध्ये सोयाबीन पेरण्याबाबतचा दाखला तलाठी याने दिलेला आहे. तसेच वादी याने नारायण रेवजी यांच्याकडुन जमीन विकत घेतल्याबाबतचे फेरफार दाखल केलेले आहे. तसेच तलाठी यांनी

दिलेल्या दिशा सुचक दाखल्यामध्ये तसेच हैशीयत दाखल्यामध्ये गट नं.२६४ मध्ये ०.०८ आर एवढी जमीन वादीच्या नावाने आहे असे दिसुन येते.

८. गैरअर्जदार/प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, वादी याने वादी यांची ०.३५ आर जमीन लघुसिंचन विभागाने कालव्याकरीता घेतलेली आहे. तसेच वादी याने ०.८५ आर जमीन बबन काटेकर यांना खरेदीखतान्वये दि.२६.०३.८४ ला तसेच ०.८३ आर जमीन द्वारकाबाई सोनटक्के हिला खरेदीखतान्वये दि.७.११.८५ ला विकलेली आहे. त्यानंतर त्याचेकडे ०.४३ आर एवढी जमीन शिल्लक राहली, परंतु त्याने मनोहर त्राटक यांना ०.७० आर जमीनीची खरेदी करुन दिलेली आहे. पुढे त्याचे असे म्हणणे आहे की, द्वारकाबाई हिने भगवान ठाकरे यांना जमीन विकली व भगवान ठाकरे यांनी प्रतिवादीला जमीन विकली. त्यानंतर त्याने मनोहर त्राटक यांच्याकडुन सुध्दा ०.७० आर जमीन विकत घेतली. अशाप्रकारे प्रतिवादी यांचेकडे १ हेक्टर, ०.५३ आर एवढी जमीन आहे. वादी याने दाखल केलेल्या सात–बारामध्ये गैरअर्जदार/प्रतिवादी यांच्या नावाने १ हेक्टर, ०.५३ आर एवढी जमीन दाखविण्यात आलेली आहे. यावरुन ही बाब सिध्द होते की, प्रतिवादी यांची जमीन त्यांच्याच ताब्यात आहे. प्रतिवादी याने गट नं.२६४ बाबत झालेल्या व्यवहारा संबंधीचे वेळोवेळीचे फेरफार दाखल केलेले आहे. तसेच लघुसिंचन विभाग यांचे अवार्डची प्रत व दाखल्याची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. परंतु वादी यांनी स्वत:च वेळोवेळी जमीन विकल्याची बाब कबुल केलेली आहे. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, त्याने तहसिलदार, मंगरुळपीर यांचेकडे सात–बारा दुरुस्ती बाबत अर्ज दाखल केला आहे, परंतु त्यावर झालेल्या आदेशाची प्रत प्रतिवादीने अभिलेखावर दाखल केली नाही. अर्जदार/वादी याने अभिलेखावर ०.०८ आर. जमीन त्याच्या ताब्यात आहे ही बाब सिध्द करण्याकरीता पुरक कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले आहे. याशिवाय त्याने नितीन गावंडे व दिनकर श्रीराम लाटे यांचे प्रतिज्ञालेख सुध्दा दाखल केलेले आहे. नितीन गावंडे याने त्याच्या प्रतिज्ञालेखामध्ये असे म्हटले आहे की, अर्जदार बंडु कराळे यांचेकडे ८ गुंठे जमीन असुन तो दरवर्षी वखरणी–डवरणी करतो व सदर जमीन त्याच्या मालकी व ताब्यात आहे. तसेच दिनकर श्रीराम लाटे याने त्याच्या प्रतिज्ञालेखामध्ये असे म्हटले आहे की, त्याने अर्जदार यांच्या शेतामध्ये दि.२०.०६.१५ ला ट्रॅक्टरद्वारे पेरणी केलेली आहे व सदर शेत ८ गुंठे आहे. गैरअर्जदार/प्रतिवादी यांनी सुध्दा अभिलेखावर राम प्रदीप कराळे व देविदास नरहरी ठाकरे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे, परंतु कागदोपत्री अर्जदार यांची बाजु प्रथमदृष्टया

सिध्द होते. अर्जदार याने कागदोपत्री बाजु सिध्द केल्याने मी मुद्दा क.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

९. मुद्दा क.२ चे उत्तर :—

अर्जदार/वादी याने तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता सदर अर्ज दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्याने असे म्हटले आहे की, गट नं.२६४ मधील त्याने एकुण ६ एकर ६ गुंठे जमीन विकत घेतली होती व वेळोवेळी त्यामधुन ५ एकर३६ गुंठे एवढी जमीन विकलेली आहे व त्याच्या कडे ०८ आर एवढी जमीन शिल्लक आहे. अर्जदार याने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सुध्दा त्याच्या ताब्यात ०८ आर एवढी जमीन आहे असे दिसुन येते. तसेच अर्जदार यांच्या नावाने पेरेपत्रक सुध्दा दाखल करण्यात आलेले आहे. गैरअर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार यांच्याकडे कोणतीही जागा शिल्लक नाही व सात—बारा मध्ये झालेल्या चुकीचा फायदा अर्जदार हा घेत आहे व त्यासंबंधाने त्याने तहसिलदार, मंगरुळपीर यांच्याकडे दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे, परंतु त्या अर्जावर झालेले आदेश त्याने अभिलेखावर दाखल केले नाही, त्यामुळे सात—बाराच्या नोंदीमध्ये चुक झाली ही बाब त्याने सिध्द केलेली नाही. न्यायाचा समतोल अर्जदार यांच्या बाजुने आहे. अर्जदार याने मुद्दा क.२ सिध्द केल्यामुळे मी त्याचे उत्तर होकारार्थी देत आहे.

१०. मुद्दा क.३ चे उत्तर :—

अर्जदार/वादी याने कायमचा मनाई हुकूम मिळण्याबाबत दावा दाखल केला आहे तसेच सोबत तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा त्याच्या ताब्याला अडथळा करीत आहे व त्याच्या मनामध्ये त्याच्या शेताची मालकी व ताबा जाण्याची भिती निर्माण झालेली आहे व तसे झाल्यास त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. वादी/अर्जदार यांनी मुद्दा क.१ व २ सिध्द केल्यामुळे तो मुद्दा क. ३ ची दाद मिळण्यास पात्र आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार यांच्या बाजुवरुन मी मुद्दा क.३ सिध्द केल्यामुळे मी त्याचे उत्तर होकारार्थी देत आहे.

११. मी या निष्कर्षास पोहोचतो की, अर्जदार यांच्या ताब्याचे संरक्षण झाले पाहीजे तसेच दोन्ही पक्षामधील वाद पुराव्याअंती निकाली निघणार आहे. तसेच जर अर्जदार यांना

तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश दिला तर गैरअर्जदार यांचे सध्याचे परिस्थितीमध्ये कोणतेही नुकसान होत नाही. करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्जदार/वादी यांचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार/प्रतिवादी यांनी किंवा त्यांच्या नोकर, एजंट यांनी वादमालमत्तेमध्ये केसचा निकाल लागेपर्यंत कोणताही अडथळा निर्माण करु नये असे त्यांना तात्पुरती मनाई करण्यात येते.

३. खर्चाचा आदेश अंतिम आदेशाच्या वेळी करण्यात येईल.

( म.म.गुप्ता )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
मंगरुळपीर

दिनांक : १५ सप्टेंबर, २०१५